स.फौ.के. नं. २१४/२०२४

नि. क्र. ०६ लगत

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – रघुनाथ पांडूरंग हातीम,

**वय**– ६२ वर्षे, **व्यवसाय** – खाजगी व्यवसाय,

**राहणार** – खडी ओझरे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>** –

**०१**. दिनांक २१/०७/२०२४ रोजी मी गावातच होतो. मला पोलीसांनी कोठेही बोलावले नव्हते. मी रस्त्याने जात असताना रस्त्यात पोलीसांनी माझी सही घेतली होती. ती सही मी कागद वाचून केली नव्हती. त्यात काय लिहिले होते, हे मला माहित नाही. मला आता दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर माझी अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणून स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरीला **<u>निशाणी १६</u>** देणेत आली).

**(साक्षीदार घडले हकीकतीप्रमाणे जबाब करत नाही त्यामुळे त्यास उलटतपासात विचारावयाचे प्रश्न विचारणेची परवानगी विद्वान सहाय्यक सरकारी वकील यांनी मागितली. साक्षीदाराचा वरील जबाब पाहाता, भारतीय साक्षी पुरावा चे कलम १५४ अन्वये परवानगी मंजूर.)**

**०२**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१/०७/२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी प्रोव्हीबीशन कामी छापा टाकणेचा उद्देश मला सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष आरोपीचे ताब्यातून ०४ लिटर गावठी दारु जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत पोलीसांनी माझेसमक्ष नमूना काढून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, तेथे माझेसमक्ष पंचनामा करणेत आला. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यावर तेथे सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविणेसाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA
Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2025.02.11 18:01:37 +0530

(ब. द. तारे)

दिनांक –११.०२.२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 11/02/2025 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 11/02/2025 |
| Evidence uploaded on | : | 11/02/2025 |